महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, ठाकरसी हाऊस, तिसरा मजला,
जे एन हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट मुंबई ४००००१.

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०६१ E-mail : ad.admin@mahakosh.in

क्र. संलेको/प्रशा-राप/का.३/०८.२०१९/सेवानिवृत्ती आदेश/७९७ दि. 30 AUG 2019

विषय : महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीबाबत.

:- आदेश -:

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा उपसंचालक संवर्गातील खालील अधिकारी माहे जानेवारी २०२० ते जून २०२० या कालावधीत त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या दिनांकास शासकीय सेवेतून नियतवयमानुसार सेवानिवृत्त होणार आहेत.

| अ. क्र. | नाव<br>पदनाम व सध्याचे कार्यालय | जन्मदिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. व्यंकट वसंतराव जोशी<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद, वाशिम | ०३ जानेवारी १९६२ | ३१ जानेवारी २०२० |
| २ | श्री. रमेश वसंत कुलगोड<br>वरिष्ठ कोषागार अधिकारी<br>कोषागार कार्यालय, पुणे | ०३ जानेवारी १९६२ | ३१ जानेवारी २०२० |
| ३ | श्रीमती सानिका संजिव देशपांडे<br>उपसंचालक<br>नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय,<br>महाराष्ट्र राज्य, पुणे | २३ मे १९६२ | ३१ मे २०२० |

कार्यालय प्रमुखांनी वरील अधिका-यांना त्यांच्या नियतवयमान सेवानिवृत्तीच्या दिनांकास स्थानिक व्यवस्था करुन सेवामुक्त करावे व तसे केल्याचे या संचालनालयास कळवावे.

सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदर प्रत अधिकृत समजण्यात यावी.

(ज. र. मेनन)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

प्रत सविनय सादर :

१) अवर सचिव, वित्त विभाग, कोषा प्रशा-१, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२) संबंधीत अधिका-यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.

/- यांनी सदरच्या अधिका-यांचे विहीत नमुन्यातील ना मागणी ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र संचालनालयास त्वरीत सादर करावे.

प्रत अग्रेषित :

१) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, ६ वा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.

२) सहसंचालक, लेखा व कोषागारे, (सर्व)

३) कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय (सर्व)

या आदेशान्वये सेवानिवृत्त होणारे अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रात कार्यरत असतील तर त्यांना या आदेशाची प्रत देण्यात यावी.

प्रत :

१) संबंधित अधिकारी / संबंधित कार्यालय :-

यांना कळविण्यात येते की, गट विमा योजनेचे सभासद झाल्याबाबतची नोंद वेळोवेळी व वाढीव दराने गट विमा योजना वर्गणी केल्याबाबतची नोंद संबधित कार्यालयाने सेवापुस्तकात केली आहे वा कसे याची खातरजमा करावी. तसेच महालेखापाल कार्यालयाने ठेवलेला सेवाविषयक (१ एप्रिल ८९ पूर्वीचा) तपशिल सेवापुस्तकात दाखल / नोंद आहे वा कसे याचीही खातरजमा करून घ्यावी. प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील निवृत्ती वेतन व रजा वेतन अंशदानाने महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन इ.) १९८१नियम ४४ अनुसार राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा झाल्याबाबत स्वत: खात्री करावी, रजावेतन / निवृत्तीवेतन अंशदानाच्या रकमा भरणा केल्याचा तपशील संचालनालयास पाठविला नसल्यास त्वरीत पाठवावा. जेणेकरून महालेखापाल कार्यालयाकडून "नादेय प्रमाणपत्र" प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करता येईल आणि निवृत्तीनंतरचे अनुज्ञेय लाभ प्रदान करताना अडचणी येणार नाहीत.

२) उपसंचालक(प्रशासन), मुख्यालय, मुंबई. यांना शासकीय येणे प्रमाणपत्र संदर्भात कार्यवाहीसाठी (अर्थसंकल्प शाखा)

/- यांनी सेवानिवृत्त होणा-या अधिका-यांनी घरबांधणी / वाहन / वैयक्तीक संगणक खरेदी इ. साठी अग्रीम घेतले आहे किंवा कसे ? याबाबतचे सद्य:स्थितीतील अभिप्राय प्रशासन राजपत्रित शाखेस त्वरीत देण्यात यावेत.

३) सहाय्यक संचालक(विभागीय चौकशी शाखा), मुख्यालय, मुंबई. यांना ना विभागीय चौकशी प्रमाणपत्र संदर्भात कार्यवाहीसाठी.

/- यांनी सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द संचालनालयाचे स्तरावरुन विभागीय चौकशी / फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे याबाबतचे अभिप्राय प्रशासन राजपत्रित शाखेस त्वरित देण्यात यावेत.

४) सहाय्यक संचालक (प्रशासन) गोपनिय अहवाल शाखा, मुख्यालय, मुंबई.

/-यांनी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या व नजीकच्या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये गट विमा योजने बाबतच्या सर्व नोंदी , वेतन आयोगानुसार वेतन निश्चितीची पडताळणी, तसेच सर्व प्रकारच्या रजा मंजूरीबाबतच्या नोंदी झाल्याची खात्रीकरुन सेवापुस्तके अद्ययावत करुन प्रशासन राजपत्रित शाखेस पाठविण्याबाबतची कार्यवाही करावी. तसेच प्रतिनियुक्ती कालावधीतील रजावेतन / निवृत्तीवेतन अंशदानाच्या रकमा भरणा केलेबाबत मा. महालेखापाल कार्यालयाकडून "नादेय प्रमाणपत्र" प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

५) सहाय्यक संचालक, (प्रशासन अराजपत्रित) शाखा, मुख्यालय, मुंबई.

६) लेखा अधिकारी (रचना व कार्यपध्दती), मुख्यालय, मुंबई.